महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेल्या पाणी पुरवठा व मलनि:स्सारण योजनांना अनुदान वितरीत करण्याबाबत.
पातुर नगर परिषद, जि. अकोला

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः सुनिअ २०१४/प्र.क्र.२८६/पापु.२२
गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत, लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ००१
तारीख :- २० सप्टेंबर, २०१९

वाचा :

१. शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. नापापु-२००८/प्र.क्र.१/पापु-२२,दि. २२.१०.२००८
२. शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,क्र.नापापु-२००८/प्र.क्र.१९८/पापु-२२, दि.२३.१२.२००८
३. शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,क्र.सुनिअ-२०१३/प्र.क्र.४९२/पापु-२२,दि.१७.०१.२०१४
४. शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.सुनिअ-२०१४/प्र.क्र.२८६/पापु-२२, दि.२८.०७.२०१४
५. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे प्रादेशिक विभाग, पुणे यांचे पत्र क्र. मु.अ (पुणे/तांशा २/२६६, दि.४.२.२०१६
६. शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,क्र.सुनिअ-२०१५/प्र.क्र.१४०/पापु-२२,दि.५.३.२०१६
७. शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,क्र.सुनिअ-२०१४/प्र.क्र.२८६/पापु-२२,दि.२४.०७.२०१७
८. मुख्याधिकारी, नगर परिषद, पातुर यांचे पत्र क्र. जा.क्र. २३०/१८,दिनांक २८.०५.२०१८
९. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक १ एप्रिल, २०१९
१०. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दिनांक ८ जुलै, २०१९

प्रस्तावना :

शासन निर्णय, दि.२२ ऑक्टोबर, २००८ अन्वये नागरी पाणीपुरवठा, मलनि:सारण, शौचालय बांधकाम व घनकचरा व्यवस्थापनासंदर्भात पर्याप्त, गुणवत्तापूर्ण सेवा, किफायतशीर सेवाशुल्कामध्ये उपलब्ध करुन देणे व विविध तांत्रिक, आर्थिक व व्यवस्थापकीय सुधारणा करण्याचे उदद्दीष्ट निर्धारीत करुन महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान राबविण्यात येत आहे. राज्यातील सर्व नागरीकांना पाणी पुरवठा व मलनि:सारणाच्या सर्वव्यापक सुविधा निश्चितपणे उपलब्ध करुन देणे असा महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

२. महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत, शासन निर्णय, दि.१७.०१.२०१४ अन्वये पातुर शहर पाणी पुरवठा रु.१५,६३,६५,०००/- किंमतीच्या भांडवली कामांस प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. शासन निर्णय, दि.५.३.२०१६ अन्वये सदर योजनेतील एकूण रु. ११,५५,७९,१२३/- इतक्या किंमतीच्या भांडवली कामांस सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार, पातुर शहर पाणी पुरवठा योजनेस रुपये १०,४०,२१,२११/-

इतके शासकीय अनुदान अनुज्ञेय असून नगर परिषदेने स्वहिश्श्यापोटी रुपये १,१५,५७,९१२/- बँक खात्यात जमा करणे आवश्यक आहे. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे प्रादेशिक विभाग, पुणे यांनी संदर्भ क्रमांक ५ अन्वये सदर योजनेतील एकूण रु. ११,५५,७९,१२३/- इतक्या किंमतीच्या भांडवली कामास सुधारित तांत्रिक मान्यता दिली आहे. पातुर नगर परिषदेने स्वहिश्श्याची संपुर्ण रक्कम संबंधित बँक खात्यामध्ये जमा केली आहे. शासन निर्णय, दिनांक २८.७.२०१४ अन्वये रु. ५२३.६४ लक्ष व दिनांक २४.७.२०१७ अन्वये रु. ३४०.६४ लक्ष असे एकूण रु. ८६४.२८ लक्ष अनुदान पातुर नगर परिषदेस वितरीत करण्यात आले आहे. मुख्याधिकारी, पातुर नगर परिषद यांनी एकूण रु. ९७८.९५ लक्ष रकमेचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले आहे. तसेच सदर योजनेंतर्गत मंजूर भांडवली कामे ९२.१४% पुर्ण झाली असल्याबाबत भौतिक प्रगती अहवाल सादर केला आहे. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, अकोला यांचा दिनांक १५.०५.२०१८ रोजीचा " योजनेचा पाहणी अहवाल " सादर केला असून उर्वरित अनुदान वितरीत करण्याची विनंती केली आहे.

मुख्याधिकारी, पातुर नगर परिषद यांनी ०७.०८.२०१८ च्या पत्रान्वये सदर योजनेवर होणा-या खर्चाचे " Overall Excess/Saving Statement" सादर केले असून त्यामध्ये सदर योजनेच्या भांडवली कामांवर सुधारित प्रशासकीय मान्यतेइतकाच म्हणजे रु. ११,५५,७९,१२३/- इतकाच खर्च होणार असल्याचे नमूद केले आहे. सदर योजनेस यापुर्वी रु. ८,६४,२७,९०१/- एवढे अनुदान वितरीत करण्यात आले असल्याने वितरीत करावयाच्या रु. १,७५,९३,३१०/- इतक्या शिल्लक अनुदानापैकी उर्वरित रु. ५८,३३,९७९/- इतके अनुदान पातुर नगर परिषदेस वितरीत करण्याचे प्रस्तावित आहे.

<u>शासन निर्णय :-</u>

राज्यातील नागरी क्षेत्रातील नगरपालिकांच्या (स्थानिक संस्था) पाणी पुरवठा व जलनि:स्सारण योजनांसाठी सहाय्यक अनुदान, या कार्यक्रमाखालील महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियांन योजनांचे कार्यान्वयन पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था यांचेकडून करण्यात येते.

२. महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानअंतर्गत, शासन निर्णय, दिनांक ०५.०३.२०१६ अन्वये सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या पातुर (जि.अकोला) शहर पाणी पुरवठा योजनेच्या भांडवली कामांकरीता अनुज्ञेय अनुदानापैकी रु. ५८,३३,९७९/- (अक्षरी रुपये अठ्ठावन्न लाख तेहतीस हजार नऊशे एकोणऐंशी फक्त) इतके अनुदान पुढील विवरणानुसार नागरी पाणी पुरवठा योजनांच्या कार्यान्वयनाकरीता सन २०१९-२० या आर्थिक वर्षात, मागणी क्रमांक वाय-२, २२१५ पाणी पुरवठा व स्वच्छता १९२, नगरपरिषदांना सहाय्य (०२) नागरी पाणी पुरवठा व स्वच्छता-(०२)(०२) नगरपालिकांच्या /नगरपरिषदांच्या पाणी पुरवठा व जलनि:स्सारण योजनांसाठी सहाय्यक अनुदान (कार्यक्रम), ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर), २२१५१६४७ या कार्यक्रमाखाली मंजूर असलेल्या रु. २०,००,००,०००/- इतक्या अर्थसंकल्पीय अनुदानापैकी अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध असलेल्या रु. ५८,३३,९८३/- एवढया अनुदानातून संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई यांना या शासन निर्णयान्वये खालील अटींच्या अधीन राहून वितरीत करण्यात येत आहे. वितरीत करावयाचे वाटप खालील विवरणपत्रामध्ये दर्शविण्यात आले आहे.

(रक्कम रुपयांत)

शहराचे नांव	योजनेची एकूण किंमत	राज्य शासना-कडून अनुज्ञेय अनुदान (९० %)	नागरी संस्थेने भरावयाची रक्कम (१० %)	नागरी संस्थेने भरलेली रक्कम	यापुर्वी वितरीत करण्यात आलेले अनुदान	याद्वारे वितरीत करावयाचे अनुदान
१	२	३	४	५	६	७
पातुर, जि. अकोला	११,५५,७९,१२३	१०,४०,२१,२११	१,१५,५७,९१२	१,१५,५७,९१२	८,६४,२७,९०१	५८,३३,९७९
					एकूण रुपये	**५८,३३,९७९**

- सदर अनुदानाच्या रकमेचे स्वतंत्र लेखे ठेवण्यात यावेत. शासनाच्या निदेशानुसार सदर अनुदान नागरी संस्थांना वितरीत करण्यात यावे.
- अनुदानाची रक्कम ज्याकरीता वितरीत करण्यात आली आहे, त्या विनिर्दिष्ट प्रयोजनाकरीताच दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत खर्च करावी.
- या वितरीत अनुदानातून होणा-या वाटपाची माहिती पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेने शासनाला कळवावी.
- मुंबई वित्तीय नियम, १९५९ मधील जोडपत्र-२ मधील नियम क्रमांक ३ अनुसार महालेखापालांच्या मागणीनुसार प्राधिकरणाचे लेखे संबंधित कागदपत्रांसह निरीक्षणाकरीता पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेने महालेखापालांना सादर करावेत.
- पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेला शासनाकडून जी अनुदाने प्राप्त झालेली आहेत किंवा जी अनुदाने यापुढील कालावधीत प्राप्त होतील त्या अनुदानाची उपयोगिता प्रमाणपत्रे पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था यांनी उपयोगिता प्रमाणपत्रात दर्शविलेल्या वितरीत अनुदानाच्या व खर्चाच्या कार्यक्रमनिहाय रकमा प्रमाणित करुन स्वाक्षरीत कराव्यात. त्या उपयोगिता प्रमाणपत्रावर सह सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी प्रतिस्वाक्षरी करावी, अशी प्रमाणपत्रे शासनाला स्विकारार्ह होतील.
- सदर अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित नमुन्यात शासनाला सादर करावे तसेच उपयोगिता प्रमाणपत्रांच्या प्रती महालेखापालांनाही पाठवाव्यात.
- सदर अनुदानाच्या खर्चाचा महालेखापाल कार्यालयात नोंदविलेल्या खर्चाशी ताळमेळ घालावा आणि विहित अहवाल विहित दिनांकांस, लेखा अधिकारी, पापु-२० पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ००१ यांच्याकडे सादर करावा.
- या शासन निर्णयान्वये संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, नवी मुंबई यांना मुक्त करण्यात आलेला निधी संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, नवी मुंबई यांचेकडे BEAMS प्रणालीवर वितरीत करण्यात येत आहे. हा निधी उपकोषागार कार्यालय, कोकणभवन, नवी मुंबई यांच्या कार्यालयातून आहरीत करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून श्री. आर. के.साकोरे, संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, नवी मुंबई यांना तसेच नियंत्रक अधिकारी म्हणून श्री. म.बा.हजारी, सह सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. आहरण व संवितरण अधिकारी तथा संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, नवी मुंबई यांनी या आदेशान्वये वितरीत करण्यात

आलेली रक्कम उपकोषागार कार्यालय, कोकणभवन, नवी मुंबई यांचे कार्यालयातून आहरित करुन सदर रक्कम ही एनईएफटी (NEFT) प्रणालीद्वारे पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, नवी मुंबई यांच्या खाती जमा करण्यात यावी.

३. या वितरीत केलेल्या अनुदानातून होणारा खर्च, मागणी क्रमांक वाय-२, २२१५ पाणी पुरवठा व स्वच्छता १९२, नगरपरिषदांना सहाय्य (०२) नागरी पाणी पुरवठा व स्वच्छता-(०२)(०२) नगरपालिकांच्या /नगरपरिषदांच्या पाणी पुरवठा व जलनि:स्सारण योजनांसाठी सहाय्यक अनुदान (कार्यक्रम), ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर), २२१५१६४७ या लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा व तो सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी मंजूर तरतूदीतून भागवावा.

४. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक १ एप्रिल, २०१९ मधील परिच्छेद ६ व ८ मधील अटींच्या पूर्ततेच्या अधीन राहून सदर नगरपरिषदेस अनुदान वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय हा वित्तीय अधिकार नियम पुस्तीका,१९७८ मधील भाग पहिला, उपविभाग-तीन, अ.क्र. ५ परिच्छेद क्रमांक २७ (२) अन्वये विभागास प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०१९०९२०२०३६३०६१२८** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Mahendra Babusing Hajari

Digitally signed by Mahendra Babusing Hajari
DN: c=IN, o=Government of maharashtra, ou=Water supply & Sanitation, postalCode=400032, st=Manipur, 2.5.4.20=2a611aa6775332ae4fb220e8dd3ec11f80d6b95fec14b729156665cff860b06b, cn=Mahendra Babusing Hajari
Date: 2019.09.21 10:29:59 +05'30'

(म.बा.हजारी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

- मा.मंत्री, (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
- मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
- मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, यांचे खाजगी सचिव, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
- मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, यांचे खाजगी सचिव,विधानमंडळ सचिवालय, मुंबई
- महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) ओल्ड सी.जी.ओ.इमारत, न्यु मरीन लाईन्स, १०१, महर्षी कर्वे मार्ग, मुंबई-४०० ०२०

- महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) भारतीय लेखा व लेखापरीक्षा विभाग कार्यालय, सिवहील लाईन्स, वेस्ट हायकोर्ट रोड, नागपूर-४४० ००१.
- विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती
- महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालया,सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई-३०.
- जिल्हाधिकारी, अकोला.
- नियंत्रक अधिकारी तथा सह सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
- आहरण व संवितरण अधिकारी तथा संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, सिडको भवन, बेलापूर,नवी मुंबई-४०० ६१४ (५ प्रतीसह)
- मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा, पुणे.
- जिल्हा प्रकल्प अधिकारी (नगरपालिका), जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला
- जिल्हा कोषागार अधिकारी, अकोला
- मुख्याधिकारी, पातुर नगर परिषद, जि.अकोला
- उप कोषागार अधिकारी, कोकण भवन, बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४.
- वित्त विभाग/नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
- कक्ष अधिकारी/लेखाधिकारी, पापु.०४, पापु-०५, पापु.२०,पापु.२१, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
- ग्रंथालय, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ६ वा मजला, विधानभवन, मुंबई-४०० ०३२.
- निवडनस्ती, पापु-२२.